# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **दि. 25 सप्टेंबर २०२५ रोजी स्वच्छ भारत अभियानांतर्गत एक दिवस- एक तास एक साथ स्वेच्छा श्रमदान रॅलीचे आयोजन**

स्वच्छ भारत अभियानांतर्गत दि. 17 सप्टेंबर 2025 ते दि. 02 ऑक्टोंबर 2025 रोजी पर्यंत केंद्रीय पेयजल व स्वच्छता विभाग (DDWS), जलशक्ती मंत्रालय आणि गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालय (MoHUA) विभागाने शहरात 'स्वच्छता उत्सव राबविण्याबाबत तसेच २५ सप्टेंबर 2025 रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंतीनिमित्त देशव्यापी एक तासाची स्वच्छता मोहिम असे निर्देश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी 07.30 वाजता स्वच्छोत्सव रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

या अभियानाचा एक भाग म्हणून स्वच्छता ही सेवा अंतर्गत शहरामध्ये एक दिवस- एक तास एक साथ स्वेच्छा श्रमदान रॅली दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी 07.30 वाजता मॅक्सेस मॉल ते गोल्डन नेस्ट ते स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान, प्रभाग समिती क्र.01, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतला ते 90 फीट रोड ते गोल्डन नेस्ट ते स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान, प्रभाग समिती क्र. 02, नवघर नाका हनुमान मंदिर ते विमल डेरी ते स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान, प्रभाग समिती क्र. 03, प्रभाग समिती क्र. 04 कार्यालय ते पाण्याची टाकी ते स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान, प्रभाग समिती क्र. 04, प्रभाग समिती क्र. 05 कार्यालय ते दिपक हॉस्पिटल ते स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान, प्रभाग समिती क्र. 05 व एस. के. स्टोन मैदान ते स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान, प्रभाग समिती क्र. 06 येथे राबविणे बाबत मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से) यांनी निर्देश दिले आहेत.

तसेच मिरा भाईंदर शहरातील विद्यार्थी, सामाजिक संस्था, बचत गट, राजकीय नेते, स्थानिक पत्रकार आणि समस्त नागरिक यांनी उपक्रमाला भरभरून प्रतिसाद देत या उपक्रमामध्ये श्रमदान करावयाचे आवाहन मिरा भाईंदर महानगर पालिकेकडून करण्यात येत आहे.